## अंतरीम पोटगी अर्जावरील आदेश

१. प्रस्तूतचा अर्ज महीलांचे घरगूती हिंसाचारापासून संरक्षण कायदा कलम २३(१) अन्वये अंतरीम पोटगी रक्कम मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**अर्जदाराचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे आहे:–**

२. अर्जदार व सामनेवाला क्र. १ हे पती पत्नी म्हणून त्यांचे नाते आजही अस्तित्वात आहे. सामनेवाला क्र. १ याचेवर अर्जदार यांचे उदरनिर्वाहाची सोय करणे बंधनकारक आहे. त्यामुळे सामनेवाला यांनी अर्जदार हिचे उदरनिर्वाहाची, खाण्या पिण्याची व सामनेवाला राहत आहे त्या घरात किंवा तशाच प्रकारच्या दुस–या घरात राहण्याची सोय करावी. तसेच त्यामध्ये लाईटबील व पाण्याची व्यवस्थेकरिता येणारा सर्व खर्च सामनेवाला क्र. १ यांनी करावा. तसेच प्रस्तुतचा अर्ज चालविण्यासा लागणारा खर्च सामनेवाला नं. १ याने दयावा. तसेच अर्जदार यांचे उदरनिर्वाहासाठी लागणारा सर्व खर्च सामनेवाला क्र. १ याने करावा. त्यामुळे अर्जदार हिस सामनेवाला यांनी ५ हजार रुपये अंतरिम पोटगी देण्याचे आदेश व्हावेत अशी विनंती केली.

३. सदर अर्जास सामनेवाला यांनी म्हणणे दाखल केले. अर्जदाराचा अर्ज व त्यातील संपूर्ण मजकुर खोटा व बनावट असून, अर्जदाराचे अर्जास कोणतेही कायदेशीर कारण घडलेले नाही. अर्जदार ही सामनेवालाकडे कसेबसे नांदली, त्यानंतर अर्जदार ही 'मला नवरा पसंत नाही, तसेच माझे मनाविरुध्द लग्न झालेले आहे.' असे म्हणुन वारंवार माहेरी जावु लागली. तसेच विनाकारण सामनेवाला व त्याचे आई वडिलांना घाण घाण शिवीगाळ करणे, तसेच किरकोळ गोष्टीवरुन अर्जदार ही आत्महत्या करणेची धमकी सामनेवाला यांना देत असत. सामनेवाला हा कोतवाल पदावर नोकरीस असुन, त्यास तुटपुंजा पगार मिळतो, त्यामध्ये त्यास त्याचे उदरनिर्वाह करणे, तसेच वयोवृध्द आईची जबाबदारी असुन, सामनेवाली आई सतत

आजारी असते तिचे दवाखाना, औषधोपचाराची जबाबदारी सामनेवाला याचे वर आहे. त्यामुळे अर्जदारास सामनेवालाची त्याग केलेली असल्याने तिला पोटगी मागणेचा कायद्याने अधिकार नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर होण्याची विनंती केली.

४. प्रस्तूतच्या अर्जाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात. सदरील मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अनु. क्र | मूद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार ही सामनेवाला यांचे कडून अंतरीम पोटगी आदेश मिळणेस पात्र आहेत का ? | होय |
| २ | अंतिम आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र.१ बाबत** :-

५. अर्जदार हिने अर्जामध्ये व अर्जाच्या पुष्ठर्थ प्रतिज्ञापत्रमध्ये असे कथन केले आहे की, अर्जदाराने सामनेवाला यांच्या कडून उदरनिर्वाहाकरीता दरमहा ५ हजार इतक्या रक्कमेची मागणी केली आहे. सामनेवाला यांनी मालमत्ता व दायित्व यांची प्रतिज्ञापत्र याकामी दाखल केले नाही. तसेच सदर अर्जास देखिल म्हणणे दाखल केलेले नाही. अर्जदाराने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता ते असे कथन केले आहे की, सामनेवाला क्र. १ हे कोतवाल या पदावर नोकरीस असून त्यांना दरमहा २० हजार ते २५ हजार पगार आहे. सामनेवाला यांची शैक्षणिक पात्रता बघता ते पदवीधर असून ते दरमहा २० हजार ते २५ हजार पगार

सहज कमवू शकतात. त्यामुळे ते अर्जदार हिला पोटगी देवू शकतात. अर्जदार हिचा सांभाळ करणे ही सामनेवाला यांची नैतिक जबाबदारी आहे.

६. अर्जदार व सामनेवाला हे पती व पत्नी असल्याचे अभिलेखावरुन सिध्द होते. सामनेवाला हे कोतवाल असल्याचे मान्य केले आहे. अर्जदार हे सामनेवाला क्र. १ यांची पत्नी असल्याने त्यांचे चरितार्थाची नैतिक जबाबदारी हे सामनेवाला क्र. १ यांच्या वर आहे. सामनेवाला यांनी अर्जदार यांची उत्पन्नाचे साधन कोणते व किती आहे हे अभिलेखावर दाखल केले नाही. त्यामुळे अर्जदारास नसलेले कोणतेही उत्पन्नाचे साधन व हल्लीची वाढती महागाई या गोष्टींचा विचार करता एखाद्या व्यक्तीस चरितार्थासाठी दरमहा कमीतकमी ३,०००/–रूपये लागतात. त्यामूळे अर्जदार हीस केवळ तिच्या दैनंदिन चरितार्थासाठी दरमहा रू. ३,०००/– सामनेवाला क्र. १ कडून पोटगी मिळविण्यास पात्र आहे. अर्जदार सदरचा अर्ज दाखल झाल्यापासून अंतरीम पोटगी मिळविण्यास पात्र आहे. सबब मुद्दा क्र.१ चे उत्तर मी वरीलप्रमाणे नोंदवते. व मुद्दा क्र २ करीता पुढील आदेश पारीत करते–

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्ज खालीलप्रमाणे अंशतः मंजूर करण्यात येतो. |
| २. | सामनेवाला क्र. १ यांनी अर्जदार यांना दरमहा अंतरिम निर्वाह भत्ता रू.३,०००/– (अक्षरी रूपये तीन हजार फक्त) सदर अर्ज दाखल केल्यापासून म्हणजेच दिनांक २७/१०/२०२३ पासून यातील मुळ अर्जाचा अंतिम निकाल होईपावेतो द्यावा. |
| ३. | थकीत रक्कम सामनेवाला यांनी अर्जदार हिला पुढील तारेखपर्यत अदा करावी. |
| ४. | महिलांचे घरगूती हिंसाचारापासून संरक्षण कायदा कलम २४ नुसार या |

| | |
|---|---|
| | अर्जाच्या आदेशाची प्रत उभयपक्षास विनामुल्य देण्यात यावी. |

**सही/-**

दिनांकः-१३.०८.२०२५

**(जी. एम. बिरादार)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

न्यायालय क्र. ३, माळशिरस